# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## नगर पथविक्रेता समितीवर सदस्यत्वासाठी जाहिरात

केंद्र शासनाने फेरीवाल्यांसाठी पारित केलेल्या "पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम,२०१४" (२०१४ चा ७) चे कलम ३६(१) मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने **"महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६"** तयार केले असून दि.३ ऑगस्ट २०१६ च्या राजपत्रात प्रसिध्द केले आहे. सदर नियमाच्या नियम ११ मधील तरतुदीनुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी नगर पथविक्रेता समिती स्थापन करणेबाबत शासनाचे निर्देश प्राप्त आहेत.

"महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६" मधील नियम ११ (२) (ख) (दोन) ते (पाच) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील संघटनांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तीची नगर पथविक्रेता समितीवर सदस्य म्हणून नेमणूक नियम १२ मध्ये घालून देण्यात आलेल्या निकषाच्या आधारावर करण्यासाठी खालील प्रमाणे नमुद संघटनांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| नियम ११ | इतर मंडळे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| (२) ख. | (दोन) अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना | ०२ |
| | (तीन) निवासी कल्याण संघ | ०२ |
| | (चार) व्यापारी संघाचा प्रतिनिधी | ०१ |
| | (पाच) पणन संघाचा प्रतिनिधी | ०१ |

**<u>नियम १२ नुसार सदस्यत्वासाठी अर्ज करण्यासाठीच्या अटी / शर्ती खालील प्रमाणे-</u>**

(१) संघटनेची किंवा संघाची नोंदणी, क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे केलेली असावी.
(२) संघटना किंवा संघ मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करील.
(३) संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळया यादीत टाकलेले नाही याबाबतचे सत्यप्रतिज्ञापत्र सादर करावे.
(४) संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिध्ददोषी नसल्याबाबतचे सत्यप्रतिज्ञापत्र सादर करावे.
(५) संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा.

वरिलप्रमाणे अटी / शर्तींची पुर्तता करणाऱ्या संघटनेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तींनी आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे नांवे प्रशासकीय भवन येथील नागरी सुविधा केंद्र, तळमजला, पाचपाखाडी, चंदनवाडी, ठाणे (प.) येथे ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत आवश्यक कागदपत्रासह लेखी अर्ज सादर करावेत. विहीत मुदतीनंतर आलेल्या व अपुर्ण कागदपत्रासह सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

महापालिका आयुक्त तथा अध्यक्ष
नगर पथ विक्रेता समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

MahaBharti.in